




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७३० . वा | शनिवार | दि. ०६ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# कार्यकर्त्यांच्या भावना व पक्ष स्वाभिमानाचा भाजप श्रेष्ठींनी विचार करावा...

## सर्वसामान्य कार्यकर्त्यांची मागणी,मैत्रीपूर्ण लढत देखील चालेल...







**जनसंचलन/बुलढाणा**

लोकसभा निवडणुकीसाठी जवळपास आता सर्वच प्रमुख पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल करून झालेले आहेत. काही अधिकृत पक्षांकडून तर काही अपक्षांनी आपाले अर्ज दाखल केले. या अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये सर्वाधिक चर्चा आहे ती विजयराज शिंदे यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जाची. आता भाजपचे कार्यकर्ते आक्रमकपणे मागणी करीत आहेत की, वेळप्रसंगी मैत्रिपूर्ण लढत झाली तरी चालेल, परंतु विजयराज शिंदे यांना भाजपने अधिकृत उमेदवारी द्यावी. या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या भावना जोपासण्याचे काम पक्षश्रेष्ठींनी करावे, अशी मागणी कार्यकर्ते करताना दिसत आहेत. बुलढाणा लोकसभेची जागा भाजपनेच लढवावी, अशी मागणी गेल्या अनेक महिन्यांपासून भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते करीत होते. शिवसेना एकसंध असताना व महायुती मजबूत असताना सातत्याने या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप कार्यकर्ते जिवाचे रान करीत होते. गेल्या १५ वर्षांपासून प्रतापराव जाधव हेच बुलढाण्याचे लोकसभेत प्रतिनिधित्व करीत आहेत. परंतु प्रतापराव जाधव हे भाजप कार्यकर्त्यांना अत्यंत सा-पत्न वागणूक देत असल्याची तक्रार भाजप कार्यकर्त्यांची आहे. एकदा निवडून आले की, पाच वर्षे प्रतापराव भाजप कार्यकर्त्यांकडे ढुंकूनही पाहत नाहीत. भाजप कार्यकर्त्यांना काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आणण्यास मदत करीत नाहीत. या प्रकारामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रतापरावांविषयी प्रचंड नाराजीचा सूर आहे. या स्थितीत आता आम्ही प्रतापरावांचे काम करणार नाही, असा धोशा भाजप कार्यकर्ते अनेक महिन्यांपासून लावत आहेत. कार्यकर्त्यांच्या भावना पाहून भाजपचे प्रभारी किंवा इतर नेत्यांनीही वरिष्ठांकडे बुलढाण्याची जागा आपल्याकडे घेण्यासाठी सातत्याने विनवणी करीत राहिले. दरम्यान, शिवसेनेकडून प्रतापरावांची उमेदवारी घोषित होण्यास विलंब लागत असल्याचे पाहून आमदार संजय गायकवाड यांनी जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आणि अचानक एका राजकीय वादळाची चर्चा सुरू झाली. परंतु गायकवाडांनी दुपारी अर्ज दाखल केला आणि सायंकाळीच प्रतापराव जाधव यांची उमेदवारी घोषित झाली. त्यामुळे जिल्ह्यातील हे राजकीय वादळ केवळ चहाच्या पेल्यातील वादळच ठरले. खरे तर ही शिवसेनेची एक स्ट्रॅटेजी होती, हे समजायलाही भाजपच्या चाणक्यांना खूप उशीर लागला. आपण उमेदवारी अर्ज का भरला, याची माहिती आमदार संजय गायकवाड मोठी रंगवून-रंगवून आपल्या कार्यकर्त्यांना किंवा जनतेला भाषणातून सांगत आहेत. या प्रकारामुळे खरे तर भाजपला शिवसेनेने शह देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे हा भाजपचा एक नैतिक पराभव असल्याचेही बोलले जात आहे. हे सर्व काही कमी होते म्हणून की काय, या वादात भर घालण्याचे काम मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. माजी आमदार तथा लोकसभा प्रभारी विजयराज शिंदे यांना त्यांची औकात लवकरच दिसून जाईल, असे आततायी वक्तव्य त्यांनी केले. आपल्या मित्रपक्षाच्या एका लोकसभा प्रभारीबद्दल आपण बोलतो आहोत, त्याच मित्रपक्षाचे कार्यकर्ते व मतदार आपल्याला या निवडणुकीत लागणार आहे, याचे बेसिक भानदेखील गुलाबरावांना कसे राहिले नाही, हा मोठाच प्रश्न आहे. शिवसेनेकडून करण्यात आलेली राजकीय मुत्सद्देगिरी आणि गुलाबरावांनी विजयराज शिंदे यांच्याबद्दल काढलेले अपशब्द, या गोष्टी भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना चांगल्याच झोंबल्या आहेत. त्यामुळे आता शिवसेनेला धडा शिकवला गेला पाहिजे, म्हणूनच विजयराज शिंदे यांची उमेदवारी पक्षाने कायम ठेवावी, वेळ प्रसंगी मैत्रिपूर्ण लढत झाली तरी चालेल, अशी भूमिका मोठ्या प्रमाणात भाजपचे कार्यकर्ते करीत आहेत. भाजपचे कार्यकर्ते आता प्रता-पराव आणि शिवसेनेची राजकीय धुणी धुण्यास तयार दिसत नाहीत. उमेदवारी देण्यात भाजप पक्षश्रेष्ठींनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा योग्य तो सन्मान केला नाही, परंतु आता तरी पक्षाचा स्वाभिमान कायम ठेवण्यासाठी तसेच शिवसेनेवर वरचढ होण्यासाठी आपल्या पक्षश्रेष्ठींनी विजयराज शिंदे यांची उमेदवारी कायम ठेवावी, अशी मागणी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते करीत आहेत.

---

# आयपीएल सट्ट्यावर पोलिसांचा छापा साहित्यासह एक ताब्यात, तिघांवर गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ खामगाव**

बुलढाणा जिल्ह्यातील आयपीएल जुगाराचे सर्वात मोठे केंद्र असलेल्या खामगावात शुक्रवारी पोलीसांनी धाडसी कारवाई केली. स्थानिक रेखा प्लॉट भागात सुरू असलेल्या एका आयपीएल जुगार अड्ड्यावर धाड टाकून एकास ताब्यात घेतले तर तिघांवर शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या कारवाईमुळे खामगाव शहरातील आयपीएल जुगारी आणि बुर्कीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. तक्रारीनुसार, शहरातील रेखा प्लॉट भागात आयपीएल सट्टा सुरू असल्याची गुप्त माहिती शिवाजीनगर पोलिसांना मिळाली. या माहितीची खात्री पटल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी सापळा रचून जुगार सुरू असलेल्या दीपक अजय करपे (२४) याच्या घरी छापा मारला. यावेळी दीपक करपे हा मोबाईलवर आयपीएलमधील गुजरात विरुद्ध पंजाबचा सामना बघून ऑनलाईन पद्धतीने सट्टा घेताना आढळून आला. त्याला रंगेहात पकडल्यानंतर त्याच्या जवळून तीन जुने वापरते मोबाईल आणि रोख ५०० रुपये सट्टा खेळण्यासाठीचे इतर




साहित्य असा ९ हजार ६५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यातील करपे याने सट्टा घेतल्यानंतर कॉल रेकार्ड आणि उतारा व्हॉटस ॲपवर मालक आणि बुकीला पाठविला. त्यानंतर पोलिस हवालदार संदीप टाकसाळ यांनी दिलेली तक्रार आणि परिस्थितीजन्य पुराव्यावरून अमन ऊर्फ रघू विजय तिवारी (रा. सतीफैल), संदीप वर्मा (रा. तलाव रोड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# मोहम्मद पैगंबर अभियानातून उभारणार सामाजिक चळवळ

जनसंचलन/मोताळा



पवित्र रमज़ान महिन्यात महाराष्ट्रीतील मुसलमान ईद साजरी करणार महाराष्ट्रातील आदिवासी/बंजारा/दलित/आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलासोबत राज्यातील मुस्लिम बांधवाच्या वतीने यंदा पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर पैगंबर सर्वासाठी हे अभिनव अभियान राबवण्यात येणार आहे.समाज बांधवकडून अनाथ बालके व गरजु कुटुंबयासमवेत ईद साजरी केली जाणार आहे अशी माहिती मोहसिन शेख अभियानचे जिल्हा सदस्य यांनी दिली,रमजान हा समस्त मानव सेवेसाठी समर्पित समाज निर्माण करण्यासाठीचा प्रशिक्षणाचा महीना आहे.रोजा हा वाईट गोष्टीचा त्याग,सत्कर्म,परोपकार,नैतिकता करुणा,दयाशीलता,व गरजु शोषित अनाथ बालके व विधवाना मदत करण्याची प्रेरणा देतो,इस्लाम हा केवळ मुस्लिमाचा धर्म आहे हा गैरसमज असून इस्लाम ही मानव जातीची जीवन पद्धति आहे हज़रत मुहम्मद पैंगबर यांचा संदेश प्रत्यक्ष कृतितुन समाजापुढे आणण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आलेले आहे. गरजु व आत्महत्याग्रस्त शेतकरी मुलाना बुलडाणा जिल्ह्यात ५०० पेक्षा जास्त मुला सोबत ईद साजरी केली जाणार आहे व त्यांना कपड़े व शिरखुरमाची मेजवानी करण्यात येणार आहे.आमच्या जवळ २०० पेक्षा जास्त मुलाना कपड़े जमा झालेले आहे जर आपण गरजु व गरीब मुलांच्या चेहऱ्यावर हसू पहायचे आहे तर आ-पली साथ मोलाची राहिल,अभियान मध्ये शेख आबीद,शोएब भाई,नदीम भाई,असीम शेख,रियाज़ भाई,वसीम अली,शरीफ भाई,रफ़ीक सौदागार,सद्दाम हुसेन,आलिम शाह पत्रकार,महेमुद शेख,यूसुफ सर,आबिद कुरेशी,इमरान खान आदी चा सहभाग आहे.

# डॉ. हॅनिमन जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी डॉ. दुर्गासिंग जाधव यांची फेरनिवड

जनसंचलन/बुलढाणा




होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक होमिओतज्ञांच्यावतीने गठीत करण्यात आलेल्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी श्री. माऊली होमिओपॅथिक हॉस्पिटलचे संचालक डॉ. दुर्गासिंग जाधव यांची सलग तिसऱ्या वर्षीही निवड करण्यात आली आहे. होमिओपॅथिक डॉक्टर्स स्टडी फोरमच्यावतीने १० एप्रिल रोजी डॉ. सॅम्युएल हॅनिमन यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त उत्सव समिती गठीत करण्यासाठी फोरमचे सर्व सभासद व होमिओतज्ञांची एक बैठक जेष्ठ होमिओतज्ञ डॉ. अजय ढगे यांच्या अध्यक्षतेत नुकतीच पार पडली. यामध्ये मागीलवर्षी पार पडलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच समितीने वर्षभर राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. सदर बैठकीत मागीलवर्षीची जयंती उत्सव कार्यकारिणी यावर्षीही कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला, तर श्री. माऊली होमिओपॅथिक हॉस्पिटलचे संचालक डॉ. दुर्गासिंग जाधव यांची समितीच्या अध्यक्षपदी एकमताने सलग तिसऱ्यांदा फेरनिवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष डॉ. स्वाती मसने, सचिव डॉ. सागर जोशी, सहसचिव डॉ. सौ. पल्लवी जोशी, कोषाध्यक्ष डॉ. पवन बजाज, सहकोषाध्यक्ष डॉ. दीपक बढे, कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. गोपाल उबरहंडे, डॉ. सौ. निलिमा जाधव, डॉ. सौ. दिशा चोपडे, डॉ. सौ. दीपाली बारोटे, डॉ. अभिजित पाटील तर समन्वयक म्हणून डॉ. रसिका वानखेडे, डॉ. उमेश जाधव यांचा समावेश आहे. बैठकीला जेष्ठ होमिओतज्ञ डॉ जी. पी. वसू , डॉ गजानन सुरडकर, डॉ. ए. यू . शेख यांनी मार्गदर्शन केले. यंदा डॉ. सॅम्युएल हॅनिमन जयंतीनिमित्त १० एप्रिल रोजी मुख्य अभिवादन कार्यक्रम, नागरिकांना उष्माघातापासून वाचवण्यासाठी मोफत औषधीचे वितरण तसेच होमिओपॅथी तज्ञांसाठी वर्षभरात विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेमिनार आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती नवनियुक्त अध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव यांनी यावेळी दिली. तसेच जयंती उत्सवाच्या प्रत्येक कार्यक्रमात सर्व होमिओतज्ञांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. सदर बैठकीला होमिओपॅथिक स्टडी फोरमच्या संपूर्ण कार्यकारिणीसह डॉ.सौ. मनिषा राठी, डॉ. सौ. दिपाली जोशी, डॉ. विजय खेडेकर, डॉ प्रविण भाले, डॉ सौ. स्वाती लद्धा, डॉ सौ. कावेरी सा-वळे, डॉ. सौ.किरण भुसारी, डॉ. सौ. शीतल उबरहंडे, डॉ. सौ. दीपाली जैस्वाल, डॉ. सौ. विजया नरवाडे, डॉ सौ. अरुणा गोरे, डॉ. पंकज शिंगणे, डॉ यशवंत पाटील, यांची उपस्थिती होती.

# खा.प्रतापराव जाधवांच्या दोन समर्थकांवर गुन्हा दाखल!



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा लोकसभेसाठी महायुतीकडून खा.जाधव यांनी २ एप्रिलच्या मुहूर्तावर उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल केल्यानंतर शहरात जंगी रॅली काढण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात महायुतीची भव्य सभा पार पडली. दरम्यान खासदार प्रतापराव जाधवांच्या दोन समर्थकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात घोषणाबाजी केली. नागेश गोविंदराव सोनुने, तसेच विनोद गजानन चांदणे अशी दोघांची नावे आहेत. दोघांविरुद्ध ३ एप्रिल रोजी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल उमेश घुबे यांनी शहर ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात नागेश गो-विंदराव सोनुने, व विनोद गजानन चांदणे या दोघांनी प्रतापराव जाधवच येणार, कोण आला रे कोण आला शिवसेनेचा वाघ आला अश्या घोषणा दिल्या. अशा पद्धतीने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात उमेदवाराच्या नावाची घोषणा करणे म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन होय. असे तक्रारीत म्हटले आहे.

# शेती वाटणीच्या वादातून एकास विषारी द्रव्य पाजून जिवे मारण्याचा केला प्रयत्न!...

जनसंचलन/मोताळा

शेती वाटणीच्या कारणावरून एकास मारहाण करत विषारी औषध तोंडात टाकून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना ४ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास कोथळी येथे घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पाच जणांविरुद्ध बोराखेडी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील कोथळी येथील गुलाब शाह आलम शाह यांनी बोराखेडी पोलीसात दिलेल्या फिर्यादीनुसार गावातीलच बानो बी आलम शाह, मुस्ताक शाह आलम शाह, लुकमान शाह उस्मान शाह, आरीफ शाह हुसेन शाह आणी हसन शाह मलंग शाह हे त्यांचे नातेवाईक आ-हेत. तक्रारकर्त्यांसोबत त्यांचा शेतीच्या वाटणीवरून वाद आहे. ४ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास बानो बी, मुस्ताक शाह आणी लुकमान शाह हे गुलाब शहा यांच्या घरासमोर आले आणी शेती विकण्यासाठी सह्या करण्याची गळ घालू लगाले. त्यास नकरा दिल्याने गुलाब शाह सोबत त्यांनी भांडण केले तसेच लोटपोट करून जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली. सोबतच तोंडात विषारी औषध टाकण्याचा प्रयत्न केला. काही औषध गुलाबशहा यांच्या तोंडात पडले. त्यामुळे



त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. घटनास्थळी दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी उपरोक्त पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास मोताळा पोलिस करीत आहेत.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# बुलढाणा लोकसभा मतदार संघासाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यासाठी बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाकडून बुलढाणा लोकसभा मतदारसंघ करिता निवडणूक निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षक सर्वसाधारण म्हणून पी. जे.भागदेव यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा संपर्क क्रमांक ७३८५९७६१४९ हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तुषार मेतकर, संपर्क ९८६०८२३६३७ हे आहेत. निरीक्षक यांचे निवासस्थान सावित्री, शासकीय विश्राम गृह, बुलडाणा येथे आहे. निवडणूक निरीक्षक कायदा व सुव्यवस्था म्हणून सेनथील क्रिष्णा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ८४२१७९७६१४ हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक श्रीधर घुट्टे ९८५०३९४३४२ हे आहेत. निरीक्षक यांचे निवासस्थान अजिंठा, शासकीय विश्राम गृह, बुलडाणा येथे आहे. निवडणूक निरिक्षक खर्च म्हणून अमित शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ८६२५९७६३७८ असा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी जिल्हा कोषागार अधिकारी ऋषिकेश वाघमारे ८६६८८०५७२७ हे आहेत. निरीक्षक यांचे निवासस्थान जिजाऊ, शासकीय विश्रामगृह, बुलडाणा येथे आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी तीनही निरीक्षक जिल्ह्यामध्ये दाखल झाले आहेत. कोणत्याही राजकीय पक्षांची, उमेदवारांची, नागरिकांची काही तक्रार असल्यास निरीक्षकांच्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

# भयमुक्त, शांततापूर्ण निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज...

जनसंचलन/बुलडाणा




आगामी लोकसभा निवडणुकीसाठी नागरिकांनी निर्भय आणि शांततापूर्ण पद्धतीने आपला मतदानाचा अधिकार बजावावा, जिल्हा आणि पोलिस प्रशासन त्यासाठी कटिबद्ध आहे, असा संदेश आज जिल्हा पोलिस दलातर्फे देण्यात आला. येत्या दि. २६ एप्रिल रोजी होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून महिला, युवक, दिव्यांग, ज्येष्ठ नागरीक आणि सर्वसामान्य नागरिकांना मतदान करता यावे, तसेच मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी पोलिस दलातर्फे आज गो वोट-चला जाऊया मतदानाला हा सामाजिक संदेश देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पोलिस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडलेल्या या मतदार जाणीव जागृती कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी, पोलिस उपअधीक्षक मसूद खान, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल पिंपळे, पोलिस निरीक्षक विकास तिडके उपस्थित होते.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनातर्फे युवक, नवमतदार, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरीक व सर्वसाधारण मतदार यांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, तसेच सर्व नागरिकांनी मतदान करून मतदानाचे प्रमाण वृद्धिंगत करण्याचा संदेश प्रत्येक मतदारांपर्यंत पोहचविण्यासाठी जाणीव-जागृतीच्या उद्देशाने पोलिस दलातर्फे आज गो वोट-चला जाऊया मतदानाला उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी, बलशाली भारताची लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचे राष्ट्रीय कार्य पार पाडावे, असे आवाहन केले. नागरिकांनी निर्भयपणे मतदानाचा अधिकार बजावावा, त्यासाठी जिल्हा व पोलीस प्रशासन कटीबद्ध असून खंबीरपणे नागरीकांच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन पोलिस अधिक्षक श्री. कडासने यांनी केले. पोलीस दलाच्या महिला आणि पुरुष तुकडीने कवायत मैदानावर ङ्गगो वोटफ्ा संदेश देणारी मानवी रांगोळी साकारून अनोख्या पद्धतीने संदेश दिला. दरम्यान जिल्ह्यात व्यापक मतदार जाणीव जागृतीसाठी विविध माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नाच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल, असा विश्वास जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी व्यक्त केला

# भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज भरण्यास मुदतवाढ

जनसंचलन/बुलडाणा

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे प्रत्येक वर्षी अनुसूचित जाती प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी योजनांचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी mahadbt.mahait.gov.in या पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. यासाठी अर्ज करण्याची मुदत वाढविण्यात आली असून आता दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत अर्ज करता येऊ शकणार आहे. सदर प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा दि. ११ ऑक्टोबर २०२३ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार सर्व संस्था, महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि अनुसूचित प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अनुसूचित प्रवर्गाकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी, व्यावसायिक पाठ्यक्रम निर्वाह भत्ता, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरण्याकरीता दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत मुदतवाढ करुन देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी मुदतीत ऑनलाईन अर्ज नोंदणी करावी. मागील वर्षाच्या तुलनेत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज कमी भरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ज्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरलेले नाही, अश्या विद्यार्थी, तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अर्ज रिप्लाय करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज भरावे. अनुसूचित जाती प्रवर्गातील योजनेस पात्र सर्व विद्यार्थ्यांनी .. या संकेतस्थळावर अर्ज भरावेत. तसेच सर्व महाविद्यालयीन प्राचार्यांनी महाविद्यालयात प्रवेशित योजनेसाठी पात्र असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील संपूर्ण विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी संकेतस्थळावर विहित मुदतीपूर्वी भरून घ्यावेत. जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ, वरिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी त्यांच्याकडे प्रवेशित विद्यार्थ्यांना महा डीबीटी पोर्टलद्वारे योजनेची आवेदनपत्र भरण्याबाबत सूचित करावे. सदर मुदतीत मागासवर्गीय विद्यार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

# छाननी अंती एकूण २५ उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र पात्र...

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण २९ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. या अर्जांची छाननी आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यात चार उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात आले असल्याने २५ उमेदवार अद्यापही कायम आहेत. दरम्यान सोमवार, दि. ८ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. बुलडाणा लोकसभा निवडणुकीसाठी २९ उमेदवारांनी ४२ नामांकन अर्ज दाखल केले. आज या उमेदवारी अर्जाची छाननी केली. यात संजय रामभाऊ गायकवाड शिवसेना, विजयराज हरिभाऊ शिंदे भाजप, श्याम बन्सीलाल शर्मा अपक्ष, ॲड. सैयद मुबीन सैय्यद नईम अपक्ष, विलास शंकर तायडे बहुजन समाज पार्टी या पाच उमेदवारांचे नामनिर्देशन पात्र अपात्र ठरले. यापैकी विजय शिंदे यांचा अपक्ष म्हणून असलेला अर्ज पात्र ठरल्याने एकूण २५ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र पात्र ठरले आहेत. छाननीअंती विजयराज हरिभाऊ शिंदे अपक्ष, प्रतापराव गणपतराव जाधव शिवसेना, रेखा कैलास पोफळकर अपक्ष, प्रताप पंढरीनाथ पाटील बहुजन मुक्ती पक्ष, रविकांत चंद्रदास तूपकर अपक्ष, असलम शहा हसन शहा महाराष्ट्र विकास आघाडी, महंमद हसन इनामदार मायनॉरिटी डेमोक्रॅटीक पार्टी, सुमन मधुकर तिरपुडे पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटीक, नंदू जगन्नाथ लवंगे अपक्ष, उद्धव ओंकार आटोळे अपक्ष, संदीप रामराव शेळके अपक्ष, गजानन जर्नादन धांडे अपक्ष, नरेंद्र दगडू खेडेकर शिवसेवा उद्धव बाळासाहेब ठाकरे, मच्छिंद्र शेषराव मघाडे सोशालिस्ट पार्टी इंडिया, ज्ञानेश्वर पुरूषोत्तम गणेश पाटील अपक्ष, दिपक भानुदास जाधव - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया डेमोक्रॅटिक, अशोक वामन हिवाळे अपक्ष, नामदेव दगडू राठोड अपक्ष, वसंत राजाराम मगर वंचित बहुजन आघाडी, संतोष भिमराव इंगळे - रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर, विकास प्रकाश नांदवे भिमसेना, बाळासाहेब रामचंद्र इंगळे अपक्ष, दिनकर तुकाराम संबारे अपक्ष, माधवराव सखाराम बनसोडे - बहुजन रिपब्लीकन सोशालिस्ट पार्टी, गौतम किसनराव मघाडे बसपा या उमेदवारांचे नामांकन अर्ज पात्र ठरले आहेत. लोकसभा निवडणुकीची अधिसूचना दि. २८ मार्च रोजी प्रसिद्ध झाली आहे. दाखल करण्यात आलेल्या सर्व २९ नामनिर्देशन पत्रांची आज छाननी करण्यात आली. दरम्यान सोमवार, दि. ८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

# भाजपा लोकसभा प्रमुख विजयराज शिंदे यांचा बेलगाव ता.मेहकर गावातून प्रचाराचा श्रीगणेशा...

जनसंचलन/मेहकर

भाजपा लोकसभा प्रमुख मा.आमदार विजयराज शिंदे यांनी बुलढाणा लोकसभा निवडणूक अर्ज भरल्यानंतर आपल्या प्रचाराची सुरवात आज मेहकर तालुक्यातील बेलगाव गावातून केली. कार्यकर्त्यांच्या, स्नेहीजनांच्या भेटीगाठी घेत असताना आज दि. ५ एप्रिल २०२४ रोजी बुलढाणा लोकसभा क्षेत्रातील शेवटचे गाव असलेल्या बेलगाव गावात विजयराज शिंदे यांनी आपल्या प्रचाराचा श्रीगणेशा केला. या प्रसंगी गावचे सरपंच तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष श्री अर्जुनराव वानखेडे यांनी समस्त गावकऱ्यांच्या वतीने विजयराज शिंदे यांचे जोरदार उत्साहात स्वागत करून ग्रामस्थां समवेत संवाद घडवून आणला. यावेळी श्री अर्जुनराव वानखेडे यांनी खा.जाधव यांच्याकडून भाजपच्या कार्यकर्त्यांवर होत असलेल्या अन्यायाचा पाढाच याप्रसंगी वाचून दाखवत, मेहकर लोणार मध्ये भाजपा कार्यकर्त्यांच्या पाठीशी जिल्हा नेतृत्व उभे राहत नसल्याची खंत आपल्या भाषणातून व्यक्त केली ,मा.आमदार विजयराज शिंदे यांच्या रूपाने एक सक्षम नेतृत्व व पर्याय कार्यकर्त्यांना मिळाले असून जिल्हा भरातील तमाम भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने त्यांच्या पाठीशी उभे राहून भरघोस मतांनी भाजपा नेते



विजयराज शिंदे यांना निवडून आणतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी विजयराज शिंदे यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. आज निवडणूक प्रचाराचाच नव्हे तर भाजपा कार्यकर्त्यांना प्रस्थापितांकडून होत असलेल्या अन्याया विरुद्ध लढण्याची खरी सुरवात आज आपण बेलगाव गावातून करीत आहोत,सर्व भाजप कार्यकर्ते व मतदारांनी येणाऱ्या निवडणूकित मतदान रुपी आशीर्वाद मला द्यावा, मी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या ४०० पार मध्ये बुलढाणा लोकसभेचा भाजपाचाच एक शिलेदार म्हणून उभा राहील



अशी ग्वाही या प्रसंगी विजयराज शिंदे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधतांना दिली. यानंतर गावातील मुस्लिम धर्मियांसह समस्त ग्रंस्थांचे श्रद्धास्थान असलेल्या सुप्रसिद्ध दर्गावर भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी याप्रसंगी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री दिपकदादा वारे, भाजपा कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री विश्रामजी पवार सर, श्री अनंता शिंदे तसेच भाजपा पदाधिकारी ,कार्यकर्ते व ग्रामस्थ,ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पृथ्वीराज चव्हाण तुतारीवर लढण्यास तयार असते, तर साताऱ्यातून उमेदवारी, शरद पवारांची अट?

वृत्तसंस्था/पुणे

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आमच्या चिन्हावर लढण्यास तयार असतील, तर त्यांच्या नावाचा विचार होऊ शकतो,फ अशी प्रतिक्रिया अनौपचारिकपणे बोलताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शुक्रवारी पुण्यात व्यक्त केली; तसेच सातारा आणि माढा या दोन्हीही मतदारसंघांतील उमेदवारांचा निर्णय झाला असून, येत्या दोन दिवसांत तो जाहीर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. पवार यांनी शुक्रवारी अनौपचारिक गप्पा मारताना पुण्यात पत्रकारांना सा-तारा आणि माढ्याच्या जागेविषयीची माहिती दिली. भिवंडीची जागा महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये वादग्रस्त विषय ठरला होता. भिवंडीच्या बदल्यात सात-ारची जागा काँग्रेसला सुटेल, अशी शक्यता होती.या पार्श्वभूमीवर बोल-ताना पवार यांनी साताऱ्याची जागा सोडणार नसल्याचे स्पष्ट केले; तसेच पृथ्वीराज चव्हाण हे आमच्या चिन्हावर लढणार असतील, तर त्यांच्या नाव-ाचा विचार होऊ शकतो, असे स्पष्ट केल्याने भिवंडीच्या जागेची चर्चा मावळल्यात जमा आहे.राष्ट्रवादीफ्चे नेते जयंत पाटील यांनी चव्हाण यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती.



उभयतांमध्ये सव्वा तास चर्चा झाली होती. त्या वेळी शरद पवार गटाकडून चव्हाण यांना साताऱ्यातून लढण्याचा प्रस्ताव दिल्याची चर्चा होती. चव्हाण यांनी साताऱ्यातून लढण्याची तयारी दर्शवली असली तरी, त्यांनी काँग्रेसच्या चिन्हावर लढणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यास पवार यांनी विरोध दर्शविला असून, चव्हाण लढणार असतील, तर त्यांनी ङ्गतुतारीफ चिन्हावर निवडणूक लढवावी, असे स्पष्ट केले आहे. पवार यांच्या पक्षाकडून साताऱ्यातून लढण्यासाठी चार नावांची चाचपणी करण्यात आली आहे. यामध्ये आमदार शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, सत्यजित पाटणकर आणि सुनील माने यांच्या नावाचा विचार करण्यात आला होता. तर, एकनाथ शिंदे गटाचे पुरुष-ोत्तम जाधव यांनी पवार यांची भेट घेतली होती. या पार्श्वभूमीवर चव्हाण यांचा पर्याय मागे पडल्यास शशिकांत शिंदे यांच्या नावावर पवारांच्या पक्षाकडून शिक्कामोर्तब केले जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## मतं मिळविण्यासाठी गिधाडवृत्तीने वागू नका, बावनकुळेंची नाना पटोलेंवर खोचक टीका...

वृत्तसंस्था/मुंबई

काँग्रेस पक्ष एकीकडे दिल्लीत न्यायपत्र जाहीर करतो आणि दुसरीकडे त्यांचे राज्याचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले भर सभेत एका खासदाराच्या मृत्यूची कामनाफ करतात, असा सवाल करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी लक्ष्य केनाना! मते मिळविण्यासाठी गिधाडवृत्तीने वागू नका, राजकारणासाठी कुणाचे मरण चिंतू नका,फ असे सांगून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पटोले यांचा निषेध केला. अकोल्याचे खासदार संजय धोत्रे यांना दीर्घायुष्य लाभो. त्यासाठी आम्ही सर्वजण रोज प्रार्थना करीत असतो; पण त्यांच्याबद्दल अभद्र बोलून त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य नागरिकांच्या, अकोला मतदारसंघातील मतदारांच्या मनाला वेदना पोहोचविल्या आहेत. तुम्ही भाजपविरोधात हवा तेवढा खोटा प्रचार करा, लोकांची मते मिळविण्यासाठी कुणासमोरही पायघड्या घाला. तुमच्या घाणेरड्या राजकारणासाठी



कुणाचे मरण चिंतू नका. कुणाच्या मरणाची वाट बघत त्यावर पोट भरणे ही गिधाडांची वृत्ती असते आणि केवळ मते मिळविण्यासाठी तुम्ही गिधाडांच्या वृत्तीने वागू नका, असेही त्यांनी म्हटले आहे.

## २४ वर्षीय युवकाने केली गळफास घेउन आत्महत्या

जनसंचलन/ देऊळगाव राजा

शहरातील आदर्श कॉलनीमधील सिद्धेश्वर देवीदास नरोडे (२४) या युवकाने राहत्या घरी दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ४ एप्रिल रोजी रात्री उघडकीस आली. सिद्धेश्वर नरोडे हा रात्री घरी एकटाच होता. घराचे दरवाजेही आतून बंद होते. त्याचे आई-वडील लग्नसमारंभ आटोपून रात्री घरी पोहोचले. तेव्हा त्यांनी दरव-ाजा उघडण्यासाठी सिद्धेश्वरच्या मोबाइलवर कॉल केला. परंतु अनेक कॉल करूनही त्याने कॉल उचलला नाही. त्यामुळे त्यांनी शेजाऱ्यांना आवाज दिला. दरम्यान खिडकीतून - डोकावून पाहिले असता सिद्धेश्वरे गळफास घेतल्याचे समोर आले. या घटनेची माहिती देऊळगाव राजा पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी अजिंक्य लक्ष्मण बोराटे (रा. आदर्शनगर) यांनी देऊळगाव राजा -. पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. घटनेचा तपास एपीआय हेमंत शिंदे हे करीत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958